जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४३०** **दिनांक - १२/१०/२०२४**

फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर.

**पी.एम.टी. बस मध्ये महिलांचे सोन्याचे दागिने चोरी करणारे आरोपी जेरबंद**
**एकुण ७,३४,०६४/- रु किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करुन,**
**एकुण ४ गुन्हे उघड**

पी.एम.टी. बस मध्ये तसेच गणेश उत्सवा दरम्यान गर्दीचा फायदा घेवुन, भावीकांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या आरोपीचा शोध घेवुन, त्यांना अटक करण्याबाबत फरासखाना पोलीस स्टेशन पुणे शहर येथील प्रभारी अधिकारी श्री.प्रशांत भस्मे यांनी तपास पथकातील अधिकारी वैभव गायकवाड व अरविंद शिंदे यांना व तपास पथकातील पोलीस अमंलदार यांना मार्गदर्शन व महत्वाच्या सुचना दिल्यानंतर पोलीस उप-निरीक्षक अरविंद शिंदे, व तपास पथकातील पोलीस अमंलदार त्यांचे बातमीदारा मार्फत तपास करीत होतो.

दिनांक ०८/१०/२०२४ रोजी तपासादरम्यान पोलीस अमंलदार गजानन सोनुने व प्रविण पासलकर यांचे बातमी वरुन, सुर्या हॉस्पीटल समोरील पी.एम.टी. बसस्थानक, कसबा पेठ पुणे येथुन तपास पथकातील पोलीस स्टाफचे मदतीने पाठलाग करुन, **आरोपी इसम नामे १) विकी कृष्णा माने,वय १९ वर्षे,रा.सरोदय कॉलनी, प्रकाश जनरल स्टोअर्स मागे मुंढवा पोलीस चौकी समोर मुंढवा पुणे २)राज कृष्णा माने, वय २३ वर्षे,रा.सरोदय कॉलनी, प्रकाश जनरल स्टोअर्स मागे मुंढवा पोलीस चौकी समोर मुंढवा पुणे ३)कृष्णा रमेश माने,वय ४४ वर्षे,रा.सरोदय कॉलनी, प्रकाश जनरल स्टोअर्स मागे मुंढवा पोलीस चौकी समोर मुंढवा पुणे ४) सुधीर नागनाथ जाधव,वय ४६ वर्षे,रा.साऊथ इंडियन हायस्कुल शास्त्रीनगर घर नं. ७६८,अंबरनाथ वेस्ट जि.ठाणे ५)संतोष शरण्णाप्पा जाधव,वय ४० वर्षे, रा.घुलेनगर लेन नं.२ वरद हॉस्पीटल समोर मांजरी बुाा पुणे.**यांना अटक क्‌रून पोलीस कस्टडी दरम्यान येरवडा पोलीस स्टेशन कडील एक गुन्हा व फरासखाना पोलीस स्टेशन कडील तीन गुन्हे असे एकुण ४ गुन्हे उघडकीस आणुन १०२.६२० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, सोन्याचे दागिने कटींग करण्यासाठी वापरलेले लोखंडी कटर असा सर्व मिळुन ७,३४,०६४/- रु किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात तपास पथकाला यश आले आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, पुणे शहर श्री.संदिपसिंह गिल, मा.सहा.पो.आयुक्त फरासखाना विभाग,पुणे श्रीमती नुतन पवार, यांचे

मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक,फरासखाणा पो.स्टे.पुणे श्री. प्रशांत भस्मे, पो.नि.(गुन्हे) श्री. अजित जाधव, स.पो.नि. वैभव गायकवाड, पो.उप-नि. अरविंद शिंदे, सपोफौज मेहबुब मोकाशी, पोलीस अमंलदार, गजानन सोनुने, नितीन

तेलंगे, महेश राठोड, संदिप कांबळे, प्रविण पासलकर, नितीन जाधव, तानाजी नागंरे, वैभव स्वामी, विशाल शिंदे, अर्जुन कुडाळकर, समिर माळवदकर, वसिम शेख, सुमित खुट्टे,महेश पवार,शशिकांत ननावरे,चेतन होळकर,यांनी केलेली आहे.

